ePaper

# मिलिंद नार्वेकरांच्या सुरक्षेत वाढ, अनेक माविआ नेत्यांच्या सुरक्षेत कपात



|वर्ष - 6 | अंक - 195 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- एनडीआरएफ आणि महापालिका आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेत समन्वयाच्या दृष्टीने चर्चा
- स्वच्छतेची पैठणी'ला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद!
- आता महाराष्ट्रातही वैद्यकीय शिक्षण मिळणार मराठीतून

www.mahaenews.com | |शनिवार|दिनांक 29 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### नगरपालिका-महापालिका निवडणुका जानेवारीत होणार?

# प्रसारमाध्यमांचे वृत्त तथ्यहीन!

## सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीच्या अंतिम निकालानंतर राज्य निवडणूक आयोग घेणार निर्णय

| पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**राज्यातील नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या आगामी निवडणुका जानेवारी महिन्यात घेण्यात येणार आहेत, असे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिले असून त्यात कोणतेही तथ्य नाही. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून अंतिम निकालानंतर राज्य निवडणूक आयोग या निवडणुकांसंदर्भात निर्णय घेईल, असे मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे.**

मुदत संपलेल्या नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये प्रशासक नियुक्त केले असून त्यांच्या माध्यमातून कारभार सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हा विषय राज्य निवडणूक आयोगाचा आहे. त्यामुळे राज्य शासन जानेवारी महिन्यात या निवडणुका घेणार आहे असे काही प्रसारमाध्यमांनी दिलेले वृत्त तथ्यहीन आहे, असेही मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे.



नुकताच अंधेरी पोटनिवडणुकीवर राज्यभरात राजकारण पेटलं आहे. ही निवडणूक शिवसेनेचे दोन्ही गट स्वतंत्र पक्षनाव आणि चिन्हाने लढवणार आहेत. त्यानुसार, या निवडणुकीसाठी ठाकरे गटाच्या पक्षाचे नाव शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे असून, मशाल हे चिन्ह असणार आहे. तसेच, एकनाथ शिंदे यांच्या गटाचे बाळासाहेबांची शिवसेना हे पक्षाचे नाव असून, ढाल-तलवार हे त्यांचे चिन्ह असणार आहे. दरम्यान, येत्या 3 नोव्हेंबरला ही निवडणूक होणार आहे. आणि शिवसेनेचे दोन्ही गट एकमेकांविरोधात लढणार आहे, त्यामुळे शिवसेनेचा कोणता गट या निवडणुकीत बाजी मारतो, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### पुढील सुनावणी येत्या 1 नोव्हेंबरला

**महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाबाबत सर्वोच्च न्यायालयातील पुढील सुनावणी येत्या 1 नोव्हेंबरला होणार आहे. अपात्रतेच्या याचिकेसह इतर मुद्द्यांवर ही सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीनंतर राज्यातील आगामी महापालिका आणि नगरपालिका निवडणूकांबाबत निर्णय होणार आहे.**

# चंद्रमुखीच्या गाण्यावर थिरकले पिंपळेगुरव आणि सांगवीकर!

## राजमाता जिजाऊ उद्यानातील हिरवळीवर तब्बल चार दिवस रंगला दिवाळी पहाटचा उत्सव

| पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

आमदार लक्ष्मण जगताप व माजी नगरसेवक शंकर जगताप मित्र परिवार तसेच भाजपचे सर्व माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीने पिंपळेगुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील हिरवळीवर रविवारपासून (दि. २३) चार दिवस रामप्रहरी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमधुर गीतांच्या मेजवानीने चार दिवस दिवाळी पहाट रंगतदार राहिली. पिंपळेगुरव आणि सांगवीतील नागरिकांनी पारंपारिक वेशभूषेत या दिवाळी पहाट कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. सलग दोन वर्षे कोरोना संकटाच्या दिवाळी सण साजरा करता न आल्याच्या पार्श्वभूमीवर रंगलेल्या या दिवाळी पहाटची मैफल पिंपळेगुरवकर आणि सांगवीकरांसाठी अविस्मरणीय ठरली.

दिवाळी सण म्हटले की रंगीबेरंगी रोषणाई, रांगोळी, पणत्या व फराळ आलेच. याव्यतिरिक्त दिवाळी पहाट हा कार्यक्रम दिवाळी सणाची मनाला खरी ओळख करून देतो. रामप्रहरी सप्तसूर आपल्या कानी पडल्यावर खरोखरच मन अगदी प्रसन्न होऊन जाते. दिवाळीत पिंपळेगुरवकर आणि सांगवीकरांचे मन प्रसन्न करण्याच्या उद्देशाने आमदार लक्ष्मण जगताप व माजी नगरसेवक शंकर जगताप मित्र परिवार तसेच भाजपचे सर्व माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीने पिंपळेगुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानात रविवारपासून (दि. २३) बुधवारपर्यंत (दि. २६) सलग चार दिवस संगीतमय दिवाळी पहाट कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी व प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या संस्थापिका अश्विनी जगताप यांच्या हस्ते चार दिवसांच्या या दिवाळी पहाट कार्यकमाला सुरूवात झाली. आज या कार्यक्रमाचा समारोप झाला.



सलग चार दिवस भल्या पहाटे बासरी-व्हायोलिन-तबला तसेच कलाकारांची जुगलबंदी आणि अवीट गोडीच्या गाण्यांच्या फराळाचा पिंपळेगुरव आणि सांगवीमधील रसिकांनी आनंद लुटला. प्रसिद्ध गायक त्यागराज खाडिलकर, राधा खुडे, ममता नेने, योगिता गोडबोले, नितीन कदम, संज्योती जगदाळे, स्वप्ना काळे, राजू जाधव, रविंद्र खोमणे, सायली टाक, मनीष तुम्बरे, गणेशकुमार, अश्विनी, शोभा कुलकर्णी, आकाश कुंभार यांनी हिंदी आणि मराठीतील बहारदार व सुरेल गीते सादर करून पिंपळेगुरवकर आणि सांगवीकरांना मंत्रमुग्ध केले. भक्ती आणि भावगीतांच्या सुमधुर मेजवानीने दिवाळी पहाट रंगतदार राहिली. विशेषतः प्रत्येक दिवशी "पुढ बाई रंग नंग रंग नंग हलगी वाजती" आणि "चंद्रमुखी"च्या गाण्यावर लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक अक्षरशः थिरकले. दोन वर्षे कोरोनाचे संकट सर्वांनी सोसले. या संकटातून बाहेर पडत साजरी झालेली यंदाची दिवाळी पिंपळेगुरवकर आणि सांगवीकरांसाठी राजमाता जिजाऊ उद्यानातील दिवाळी पहाट कार्यक्रमांमुळे अविस्मरणीय ठरली.

# एनडीआरएफ आणि महापालिका आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेत समन्वयाच्या दृष्टीने चर्चा!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि कमांडंट संतोष सिंह यांच्यामध्ये विचारविनिमय

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे कमांडंट संतोष सिंह यांनी आज महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली. शहरात उद्भवणाऱ्या आपत्कालीन घटनांप्रसंगी महापालिकेची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम आणि तत्पर होण्याच्या दृष्टीने तसेच आपत्कालीन परिस्थितीत एनडीआरएफ आणि महापालिका आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा यांच्यातील समन्वयाच्या दृष्टीने या भेटीत चर्चा झाली. महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशामक विभाग, वैद्यकीय विभाग, एनडीआरएफ, महाराष्ट्र पोलीस दल आणि इतर आस्थापनांच्या यंत्रणा यांच्यासाठी संयुक्त सराव, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्याबाबत आयुक्त शेखर सिंह आणि कमांडंट संतोष सिंह यांच्यामध्ये विचारविनिमय झाला. यावेळी डेप्युटी कमांडंट दिपक तिवारी, महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल उपस्थित होते. औद्योगिकनगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहत आहे. याठिकाणी अनेक मोठ्या औद्योगिक संस्था असून यामध्ये रासायनिक वायुंचा वापर करणाऱ्या अपघात प्रवण औद्योगिक संस्थांचाही समावेश आहे. शिवाय पिंपरी चिंचवड शहरातून तीन नद्या वाहतात, पावसाळ्यात नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊन पूर परिस्थिती निर्माण होते. औद्योगिक परिसरात वायू गळती, रासायनिक आग अशा घटना घडल्यास काही वेळा आपत्कालीन परिस्थितीत एनडीआरएफला पाचारण करावे लागते. त्यादृष्टीने शहरातील आपत्तीच्या घटना हाताळण्यासाठी महापालिकेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला आहे. इमारत कोसळणे, औद्योगिक परिसरातील रसायन गळती आदी आपत्कालीन घटना घडल्यास तसेच रासायनिक हल्ल्यासारखी गंभीर परिस्थिती उद्भवल्यास शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज असली पाहिजे. यामध्ये एनडीआरएफची भूमिका महत्वाची असते. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जात असताना शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम असणे गरजेचे आहे. आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व यंत्रणांमध्ये योग्य समन्वय राहावा यासाठी एनडीआरएफच्या माध्यमातून तात्काळ प्रतिसाद म्हणून करावयाच्या उपाययोजनांबाबत महापालिका, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, महाराष्ट्र पोलीस दल यांच्यासह इतर संबंधित यंत्रणांचा संयुक्त सराव, प्रात्याक्षिके आणि प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्याचा उद्देश असल्याचे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांनी यावेळी सांगितले. शहरातील आपत्तीविषयक घटनांबाबत कमांडंट संतोष सिंह यांनी यावेळी माहिती घेतली. आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत उपलब्ध करून देण्यासाठी एनडीआरएफ यंत्रणा सज्ज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# भाज्यांचे दर आवाक्याबाहेर; परतीच्या पावसाचा परिणाम

## किमतीत २५ ते ३० टक्के वाढ

।पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज ।

ठाणे, पुणे, नाशिक : आठवड्यापूर्वीपर्यंत राज्यातील विविध भागांत परतीच्या पावसाने केलेल्या तांडवामुळे भाजीपाल्याचे प्रचंड नुकसान झाले. काढणीला आलेल्या भाज्या पूर्णपणे खराब झाल्या. त्यामुळे मुंबई, ठाणे तसेच उपनगरांतील बाजारात भाज्यांचे दर थेट २० ते २५ टक्क्यांनी वाढले असून हीच परिस्थती नाशिक आणि पुण्यातही आहे.

राज्यातील पुणे, नाशिक जिल्ह्यांसह इतर जिल्ह्यांत झालेल्या परतीच्या पावसामुळे शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे. मुंबई-ठाणे आणि पुण्यात भेंडी, गवार, शिमला मिरची, फ्लॉवर, कोबी, वांगी, फरसबी अशा सर्वच भाज्यांचे दर कडाडले आहेत. सध्या बाजारात उत्तम दर्जाच्या भाज्या केवळ २५ टक्केच येत असल्याची माहिती समोर आली आहे. वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज ४०० ते ४५० भाज्यांच्या गाड्या दाखल होत आहेत, अशी माहिती वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून देण्यात आली. किरकोळ बाजारात गवार १२० रुपये प्रति किलोने तर, वाटाणा २५० रुपये प्रति किलोने विक्री केले जात आहे. तसेच नेहमी स्वस्त असणाऱ्या फ्लॉवरची विक्रीदेखील १०० रुपये प्रति किलोने करण्यात येत आहे. सध्या भाजीपाला लगेच सडत असल्याने त्याची साठवणूक करणे अशक्य असल्याचे नाशिकमधील किरकोळ भाजीपाला विक्रेते गणेश बोरसे यांनी सांगितले. मागणीच्या तुलनेत फळभाज्यांची आवक कमी होत आहे. त्यामुळे घाऊक आणि किरकोळ बाजारात फळभाज्यांच्या दरात वाढ झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील अडते विलास भुजबळ यांनी दिली.

भाज्यांची आवक २५ ते ३० टक्क्यांनी घटल्याचे चित्र आहे. परिणामी, दरात वाढ झाली आहे. बाजारात भाज्यांची आवक सुरळित होताच ही परिस्थिती निवळेल असा अंदाज व्यापारी व्यक्त करीत आहेत.

अजून शेतात पाणी.




# शहरात तीन ठिकाणी आग

## रविवार पेठ, नेहरु रस्ता, हडपसर भागात आगीच्या घटना

। पिंपरी ।। महाईन्यूज ।

शहराच्या वेगवेगळ्या भागात तीन ठिकाणी आग लागल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.

नेहरू रस्त्यावरील अप्सरा चित्रपटगृहाजवळ सायंकाळी नाल्यातून मोठ्या प्रमाणावर धूर येत असल्याची माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. अग्निशमन दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. नाल्यात साठलेला कचरा पेटल्याने आग लागल्याचे जवानांच्या लक्षात आले. अग्निशमन अधिकारी प्रशांत गायकर आणि जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली, अशी माहिती अग्निशमन दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी दिली. सायंकाळी सव्वासातच्या सुमारास हडपसर भागातील चिंतामणी नगर परिसरात एका गादी कारखान्यात आग लागली. अग्निशमन दलाचे अधिकारी प्रमोद  सोनवणे आणि जवानांनी आग आटोक्यात आणली. आगीचे कारण समजू शकलेले नाही.

रविवार पेठेतील तांबोळी मशिदीजवळ तारा मॉल येथे आग लागल्याची माहिती मिळाली. सात मजली इमारतीत आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. तारा मॉलच्या इमारतीच्या छतावर ठेवलेल्या रिकाम्या प्लास्टिक टाकीला आग लागल्याचे जवानांच्या निदर्शनास आले. जवानांनी पाण्याचा मारा करुन दहा मिनिटात आग आटोक्यात आणली.

# गळीत हंगामावर संकट; परतीचा पाऊस आणि मजूर टंचाईचा परिणाम

**पुणे** : उसाखालील वाढलेले क्षेत्र, उशिराने सुरू झालेला गाळप हंगाम, परतीच्या पावसामुळे निर्माण झालेला व्यत्यय आणि मोठी मजूर टंचाई आदींचा परिणाम म्हणून यंदाच्या गळीत हंगामात २८ ऑक्टोबरपर्यंत फक्त ३२ कारखाने सुरू झाले आहेत. सुरुवात संथगतीने झाल्यामुळे हंगामाचे नियोजन कोलमडण्याची शक्यता वाढली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'ऊसतोडणीसाठी यंत्रांचा वापर वाढविण्याचे धोरण असले तरीही चिखलात यंत्रांद्वारे ऊसतोडणी होऊ शकत नाही. दिवाळीमुळे अद्याप पुरेशा प्रमाणावर मजूर कारखान्यांवर आलेले नाहीत. आता दिवाळीनंतर मजुरांचा ओघ सुरू झाला आहे. पण, शेतात चिखल असल्यामुळे मजुरांकडूनही तोडणी शक्य नाही.

# स्वच्छतेची पैठणीला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद!

## ‘हरा गिला, सुखा नीला’ या मोहिमेअंतर्गत सर्व प्रभागांत आठ ठिकाणी कार्यक्रम उत्साहात

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



**शहरात घनकचरा विलगीकरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ‘हरा गिला, सुखा नीला’ या मोहिमेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात सर्व प्रभागांत आठ ठिकाणी महिलांसाठी घेतलेल्या ‘स्वच्छतेची पैठणी’ या कार्यक्रमास महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. या माध्यमातून कचरा विलगीकरणाचे महत्त्व या विषयावरील प्रश्नमंजुषा तसेच प्रबोधनाद्वारे जनजागृती करण्यात आली.**

अ प्रभागातील विठ्ठल मंदिर येथे झालेल्या कार्यक्रमामध्ये माधुरी कुपटे यांनी प्रथम क्रमांकाची पैठणी जिंकली. जान्हवी पाटील यांनी द्वितीय तर शोभा राखपसरे यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. ब प्रभागात चिंचवड येथील राजमाता जिजाऊ पर्यटन केंद्र येथील कार्यक्रमात ज्योती तळेकर यांनी पैठणीचे बक्षीस जिंकले, पूनम लोहार यांनी द्वितीय क्रमांक तर पूजा साळवे यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले.

क प्रभागातील गवळीनगर येथे झालेल्या कार्यक्रमात मनीषा शेळके यांनी पैठणी, सोनल काळे यांनी द्वितीय तर शिवगंगा पवार यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले.ड प्रभागातील डायनासोर उद्यान येथील कार्यक्रमामध्ये अनुजा कांबळे यांना प्रथम क्रमांकाची पैठणी तर अन्य दोन महिलांना द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे मिळाली.

इ प्रभागातील मोशी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेत कविता वैरागल यांनी प्रथम क्रमांकाची पैठणी तर संगीता सुगर यांनी द्वितीय, कविता नाईकनवरे यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले,फ प्रभागातील कार्यक्रमात पूनम खंडागळे यांनी प्रथम क्रमांकाची पैठणी, सरीन शेख यांनी द्वितीय तर सुजाता मकड यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले.

ग प्रभागातील बापुजी बुवा उद्यानात झालेल्या कार्यक्रमात सोनी शिंदे यांनी प्रथम क्रमांकाची पैठणी तर छबूबाई बरिगल यांनी द्वितीय, वनिता लिंबोळी यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षिस मिळवले. ह प्रभागातील आई उद्यान.दापोडी येथे झालेल्या कार्यक्रमात अश्विनी शिंदे यांनी प्रथम क्रमांकाची पैठणी तर वैशाली लगाडे यांनी द्वितीय, नलिनी अहिरे यांनी तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले.

कार्यक्रमात नागरिक तसेच संबधित क्षेत्रीय अधिकारी, सहाय्यक आरोग्याधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सहा आरोग्य निरीक्षकांनी उपस्थितांना स्वच्छतेचे तसेच कचरा विलगीकरणाचे महत्त्व सांगितले.

### क्षेत्रीय स्तरावर प्रचार व प्रसार

**भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्याच्या नागरी प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ‘हरा गिला, सुखा नीला’ या मोहिमेचा क्षेत्रीय स्तरावर प्रचार व प्रसार करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने शहरात सर्व प्रभागांत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून शहरातील आठ ठिकाणी कचरा विलगीकरणावर आधारित स्वच्छतेची पैठणी हा अनोखा कार्यक्रम अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपआयुक्त अजय चारठाणकर आणि आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांच्या नियंत्रणाखाली घेण्यात आला. यावेळी विजेत्या आठही प्रभागातील महिलांना प्रथम क्रमांकासाठी पैठणी, द्वितीय क्रमांकासाठी सोन्याची नथ तर तृतीय क्रमांकासाठी चांदीचा छल्ला देण्यात आला.**

# युवा सेनेच्या 'शिवदिपोत्सवाने' उजळून निघाला थेरगावातील शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

## शिवदिपोत्सवाला महिला, युवकांचा मोठा प्रतिसाद, हजारो दिव्यांनी उजळला पुतळा परिसर

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



**पिंपरी-चिंचवड शहर युवा सेनेचे युवा अधिकारी विश्वजीत बारणे यांच्या वतीने दीपावली सणानिमित्त थेरगावातील डांगे चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक पुतळा येथे 'शिवदिपोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हजारो दिव्यांनी पुतळा परिसर उजळून निघाला. या शिवदिपोत्सवाला महिला, युवकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.**

बुधवारी (दि.26) सायंकाळी झालेल्या या शिवदिपोत्सवाला मावळचे खासदार श्रीरंग बारणे, सरिता श्रीरंग बारणे, बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, धनाजी बारणे, युवा सेना अधिकारी विश्वजीत बारणे, उद्योजक महेश बारणे, पिंपरी विधानसभा संघटिका सरिता साने, माजी नगरसेविका विमल जगताप, युवा सेना पदाधिकारी राजेंद्र तरस , निखिल येवले, बशीर सुतार, अंकुश कोळेकर, माऊली जगताप, सोमनाथ गुजर, दीपक गुजर, संग्राम धायरीकर, बाळासाहेब वाघमोडे, नंदू जाधव, रंजना साळवे, पुष्पलता फुले, दिपाली गुजर, सुंदराबाई कांबळे, नूरजहा शेख, अनिता जोग, शेटके, युवा सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवा सेनेच्या वतीने दरवर्षी दिपावली सणानिमित्त थेरगावातील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक पुतळा परिसरात दिपोत्सव साजरा केला जातो. कोरोना महामारीमुळे दोनवर्षे दिपावली सण साधेपणाने साजरा केला. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. कोरोनाचा अंधःकार दूर झाल्याने सर्वत्र मोठ्या उत्साहात दिपावली सण साजरा होत आहे. युवा सेना अधिकारी विश्वजीत बारणे यांच्या वतीने यंदा मोठ्या उत्सहात शिवदिपोत्सव साजरा करण्यात आला. हजारो दिव्यांनी पुतळा परिसर उजळून निघाला. दिपोत्सवाला महिला, ज्येष्ठांसह, युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**युवा सेनेच्या वतीने दरवर्षी दिपावली सणानिमित्त थेरगावातील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक पुतळा परिसरात दिपोत्सव साजरा केला जातो. कोरोना महामारीमुळे दोनवर्षे दिपावली सण साधेपणाने साजरा केला. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. कोरोनाचा अंधःकार दूर झाल्याने सर्वत्र मोठ्या उत्साहात दिपावली सण साजरा होत आहे. युवा सेना अधिकारी विश्वजीत बारणे यांच्या वतीने यंदा मोठ्या उत्सहात शिवदिपोत्सव साजरा करण्यात आला. हजारो दिव्यांनी पुतळा परिसर उजळून निघाला. दिपोत्सवाला महिला, ज्येष्ठांसह, युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.**

## संपादकीय

# सर्वशक्तिमान जिनपिंग

***चीनच्या अध्यक्षपदी तहहयात राहता येईल, अशी तरतूद करणारे शी जिनपिंग यांची तेथील सत्ताधारी साम्यवादी पक्षाच्या (सीसीपी) सरचिटणीसपदी निवड होण्यात अनपेक्षित काही नाही. त्यांना पाच वर्षांचा हा तिसरा कार्यकाल मिळण्याची औपचारिकता आता पूर्ण झाली आहे.***

दहा वर्षांपूर्वी सत्तेवर आलेले जिनपिंग यांच्या हाती पक्षाचे सरचिटणीस, चीनचे अध्यक्ष आणि लष्करी आयोगाचे अध्यक्ष अशी तिन्ही प्रमुख पदे, म्हणजेच सर्व सत्तासूत्रे एकवटली असून, ती आणखी काही काळ टिकणार यात शंका नाही. जिनपिंग यांच्या विरोधातील बंडाची अफवा मध्यंतरी पसरली होती; प्रत्यक्षात ती पाश्चिमात्य माध्यमांमधील अटकळ ठरली. 'सीसीपी'च्या विसाव्या महासभेच्या आधीच याबाबतच्या वावड्या हवेत विरल्याने, या परिषदेत जिनपिंग यांना अनपेक्षित असे काही घडण्याची शक्यता नव्हतीच. जिनपिंग यांच्या आधी चीनची धुरा सांभाळलेले माजी अध्यक्ष हू जिंताओ यांना या महासभेतून २३०० प्रतिनिधींच्या समोर हुसकावून लावण्यात आल्याचे दृश्य साऱ्या जगाने पाहिले. पक्षांतर्गत विरोधकांवरील कारवाईचे सूचन जिनपिंग यांनी याद्वारे केले होते. ही महासभा जिनपिंग यांच्या वाढत्या सामर्थ्यावर शिक्कामोर्तब करणारी ठरेल आणि जिनपिंग यांच्या निष्ठावंतांनाच सत्ता वर्तुळात स्थान मिळेल, याचा अंदाज आधीच आला होता; तो खरा ठरला. 'सीसीपी'च्या शक्तिशाली स्थायी समितीवर जिनपिंग यांनी आपल्या निष्ठावंतांची वर्णी लावली. पक्षाचे शांघाय येथील प्रमुख आणि जिनपिंग यांचे विश्वासू सहकारी ली छियांग यांच्यासह निष्ठावंतांना बक्षिसी मिळाली आहे. सध्याचे पंतप्रधान ली कछियांग यांचा कार्यकाळ मार्चमध्ये संपेल; त्यानंतर त्यांची जागा छियांग घेतील. कोव्हिड साथरोगाची हाताळणी छियांग यांनी योग्य रीतीने केली नसल्याचा आरोप आहे; परंतु खुद्द जिनपिंग यांच्यावरही हाच आरोप करता येऊ शकतो. त्यामुळे येथे कामगिरी हा काही मुद्दा नाही. वास्तविक, पक्षाच्या अशा अधिवेशनात आपल्या कार्यकाळातील कामगिरीचा मुद्दा ठळकपणे मांडला जातो. मात्र, 'सीसीपी'च्या या महासभेत जिनपिंग यांनी त्यावर भर न देता, चीनला असलेले धोके आणि आव्हाने यांवर लक्ष केंद्रीत केले. ज्या जिंताओ यांना हुसकावून लावण्यात आले, त्यांच्या कार्यकाळात चीनची आर्थिक भरभराट वेगाने झाली आणि जगावर मुद्राही उमटली. जिनपिंग यांच्या कार्यकाळात आर्थिक वेग कमी होत गेला. विकासाच्या फुग्याला टाचणी लागली. शेजारी देशांशी चीनने संघर्ष सुरू केला. लष्करी साहसवाद वाढला. आधी डोकलाम आणि नंतर गलवान यांच्या रूपाने चिनी आक्रमणाचा सामना भारताला करावा लागला.

# वाढत्या तापमानाचा भागीदार




सध्या टेलिकॉम इंडस्ट्रीचा जोर आहे. आता तर देशात 'फाइव्ह-जी' आले आहे. संपूर्ण वीजनिर्मितीच्या २० टक्के भाग टेलिकॉम इंडस्ट्रीला लागतो. वाढत्या विजेच्या प्रमाणामुळे २०२५पर्यंत कार्बनडाय ऑक्साइडचे उत्सर्जन हे ५.५ टक्क्यांवर जाईल, असा अंदाज आहे.

तापमानवाढीचा विषय जेव्हा चर्चेस येतो, तेव्हा सगळ्यात आधी विचार येतो तो कार्बनडाय ऑक्साइड ओकत असलेले मोठमोठे कारखाने, खाणी आणि ट्रान्स्पोर्ट क्षेत्राचा आणि कार्बनडाय ऑक्साइडमुळे वाढणारे जागतिक तापमान व परिणामी निर्माण होणाऱ्या हवामान बदलाच्या समस्या. तापमानवाढीचे दुष्परिणाम मागील काही वर्षांपासून वेगवेगळ्या रूपाने अनुभवतो आहोत. तापमानवाढीस कारखाने, उद्योग, खाणी, ट्रान्सपोर्ट इत्यादींसह रोजच्या वापरातला स्मार्टफोनही जबाबदार आहे. कळत-नकळत आपण त्यातून निर्माण होणाऱ्या ग्रीन हाउस वायूबद्दल अनभिज्ञ असतो किंवा त्याकडे दुर्लक्ष करतो. आज हा एक चिंतेचा विषय आहे. मोबाइल तयार करण्याच्या प्रक्रियेत किती ग्रीन हाउस गॅसचे उत्सर्जन होत असेल, खाणींमधून काय काय काढावे लागते हे आपल्याला माहीत असणे गरजेचे आहे. कारण, २०४०पर्यंत संपूर्ण कार्बनडाय ऑक्साइडच्या उत्सर्जनापैकी १४ टक्के उत्सर्जन हे स्मार्टफोनमुळे असेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. आपण एका मोबाइलवरून दुसऱ्या मोबाइलवर एक मिनिट बोललो तर ५७ ग्रॅम कार्बनडाय ऑक्साइडचे उत्सर्जन होते. एक एसएमएस पाठवला की ०.०१४ ग्रॅम आणि एक जीबी डेटा डाउनलोड केल्यास तीन किलो कार्बनडाय ऑक्साइडचे उत्सर्जन होते. एका अभ्यासादरम्यान असे लक्षात आले की, वर्षभर दोन मिनिटे रोज मोबाइल वापरला तर (ते तर शक्यच नाही म्हणा) ४७ किलो कार्बनडाय ऑक्साइडचे उत्सर्जन होते आणि एक तास वापरला तर वर्षाला १,२५० किलो कार्बनडाय ऑक्साइडचे उत्सर्जन होते. आज जगात स्मार्टफोन वापरणाऱ्या लोकांची संख्या २५४ कोटींच्या घरात आहे आणि नुसत्या या फोनमुळेच १.२५ दशलक्ष टन



कार्बनडाय ऑक्साइडची मात्रा वातावरणात उत्सर्जित केली जाते, जी तापमानवाढीस पूरक आहे. टक्केवारीचा विचार केला तर एकूण कार्बनडाय ऑक्साइडच्या उत्सर्गाच्या एक चतुर्थांश भाग हा मोबाइलमुळे असतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. आपण याला मोबाइलचे कार्बन फुटप्रिंट म्हणू शकतो. हे कार्बन फुटप्रिंट दोन भागांत विभागले जाते. एक, मोबाइल निर्मिती आणि दोन, मोबाइलचा उपयोग आणि मोबाइलचे चार्जिंग.

निर्मितीचा विचार केला तर, एका साधारण स्मार्टफोनसाठी १६ किलो कार्बनडाय ऑक्साइडचा उपसर्ग होतो आणि तोच फोन दोन वर्षे वापरला तर ते प्रमाण जाते २२ किलोंपर्यंत. मोबाइल तयार करताना ब्रोमिन, लेड, मर्क्युरी इत्यादी घातक वस्तूंचाही वापर होतो. त्या व्यतिरिक्त सोने, टीन, लिथियम, टनटालम असे अनेक भाग असतात, जे खाणीतून उत्खनन करून काढले जातात. मोबाइल हे एकाच कंपनीचे असले तरी कार्बन फुटप्रिंट मॉडेलनिहाय वेगवेगळे असते. ते ६५ ते ९५ किलोंच्या आसपास असते. जेवढा तुमचा फोन महाग, तेवढे त्याचे कार्बन फुटप्रिंट जास्त. एक छोटेसे उदाहरण. साधारणतः इंग्लंडचा एक माणूस वयाच्या ८१ वर्षांपर्यंत जगतो. तो वयाच्या दहाव्या वर्षापासून पहिला मोबाइल वापरायला सुरुवात करतो. म्हणजे तो ७१ वर्षे मोबाइलचा वापर करतो. सरासरी ॲपलच्या फोनचे कार्बन-फुटप्रिंट ७० किलो. कंपनीला माहिती असते की त्यांचा फोन जास्तीतजास्त तीन वर्षे वापरला जाणार. नंतर बदलला जाणार. त्यानुसार एक ब्रिटिश नागरिक ७१ वर्षांच्या जीवनकाळात सुमारे २३ फोन बदलतो. म्हणजे ७० गुणिले २३ बरोबर १,६१० किलो कार्बनडाय ऑक्साइडचे उत्सर्जन. मोबाइल बदलण्यात आपण भारतीयही कमी नाही. दरवर्षी मोबाइलचे फीचर्स बदलतात. मेमरीमध्ये वाढ होते. किंबहुना आहे तीही मेमरी कमी पडू लागते. मोबाइलमध्ये आधी एक कॅमेरा असायचा. नंतर दोन झाले. मग तीन, चार कॅमेरेवाले आणि आता तर पाच कॅमेरेवाले मोबाइल बाजारात आले आहेत. मग काय बदला फोन!

# आदिवासींच्या कल्याणासाठी अनुसूचित क्षेत्रांची पुनर्रचना हवी

**आदिवासींच्या कल्याणासाठी, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यघटनेत अनेक तरतुदी आहेत.**

सन २०११च्या जनगणनेनुसार राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ४४ हजार १९९ गावे व शहरांमधील ११ कोटी २३ लाख या एकूण लोकसंख्येपैकी एक कोटी पाच लाख आदिवासी लोकसंख्या (९.३५ टक्के) आहे. राज्यातील ३१ हजार ६३९ गावे-शहरांपैकी पावणेसात हजार गावे व शहरांत ५० टक्क्यांहून अधिक आदिवासी लोकसंख्या आहे. राज्यात सर्वप्रथम १९५० मध्ये अनुसूचित क्षेत्र जाहीर झाले. त्यानंतर केंद्र सरकारच्या १९८५ च्या राजपत्रात राज्यातील पाच हजार ३८८ गावांना अनुसूचित क्षेत्राचा दर्जा देण्यात आला. १३ जिल्ह्यांतील २३ तालुके संपूर्ण व ३६ तालुके अंशतः अनुसूचित क्षेत्रात असून यातील महसूली गावांची संख्या २०११च्या जनगणनेनुसार पावणेसहा हजार आहे. १९९० मध्ये राज्याने गावांना अनुसूचित क्षेत्राचा दर्जा दिला. लोकसंख्येतील आदिवासींचे प्राबल्य, एकत्रित क्षेत्र आणि वाजवी आकार, क्षेत्राचे तुलनेने अविकसित स्वरूप आणि लोकांच्या आर्थिक मानकांमध्ये असमानता, या



केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांचा यासाठी आधार होता.

अनुसूचित क्षेत्र मुख्यतः ग्रामीण भागात आहे. तेथील विकासासाठी केंद्राने १९९६मध्ये 'पंचायत (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत) कायदा' (पेसा) लागू केला. अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी जमातींकडे अधिक अधिकार जातील, अशी त्यावेळी कल्पना होती. हा कायदा २०१४मध्ये महाराष्ट्रात लागू झाला. आदिवासी भागात पंचायती राज व्यवस्था पारदर्शी, कृतिशील, जबाबदार आणि भ्रष्टाचारमुक्त होईल, हा त्याचा हेतू आहे. या कायद्यान्वये अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना अनेक अधिकार प्रदान केले. त्यांचा प्रत्यक्षात वापर व्हावा, यासाठी अर्थसंकल्पाच्या नियमित योजनांद्वारे आदिवासी विकास विभागाला मिळणाऱ्या तरतुदीच्या पाच टक्के निधी या गावांच्या ग्रामसभांना त्यांच्या गावातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत केला जातो. मात्र, १९७१च्या जणगणनेत वगळलेल्या आदिवासीबहुल क्षेत्राला या कायद्यानुसार मिळणाऱ्या राजकीय, आर्थिक व रोजगार विषयक अशा विविध फायद्यांपासून दीर्घकाळ वंचित ठेवले आहे. हा अन्याय दूर होण्यासाठी अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेची गरज आहे.

केंद्राची १९८५मधील अनुसूचित क्षेत्रातील गावे जाहीर झाली, ती अधिसूचना १९७१च्या जनगणनेतील माहितीवर आधारित होती. त्यात, विर्दभातील आदिवासीबहुल गोंदिया, भंडारा, नागपूर या जिल्ह्यांत व वर्धा, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांत आदिवासींची लोकसंख्याच नसल्याचे दर्शविले आहे. त्यामुळेच अधिसूचनेत उपरोक्त जिल्ह्यांतील आदिवासी क्षेत्राचा समावेश नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आता महाराष्ट्रातही वैद्यकीय शिक्षण मिळणार मराठीतून, सरकारची मोठी घोषणा

## वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांची माहिती, एमबीबीएस किंवा मेडिकल शाखांचं शिक्षण इंग्रजी भाषेतूनच

**।मुंबई । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

मध्य प्रदेश सरकारने अलीकडेच वैद्यकीय शिक्षण हिंदी भाषेतून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. वैद्यकीय शिक्षण हिंदीतून उपलब्ध करून देणं, ही मध्यप्रदेश सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते हिंदी अभ्यासक्रमाचा शुभारंभ झाला आहे. त्यामुळे मध्य प्रदेश हे हिंदीतून वैद्यकीय अभ्यासक्रम शिकवणारं देशातील पहिलंच राज्य ठरलं आहे.



यानंतर आता महाराष्ट्र सरकारनेही वैद्यकीय अभ्यासक्रम मराठीतून उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील वर्षापासून वैद्यकीय अभ्यासक्रम मराठी भाषेतून उपलब्ध करून दिला जाणार आहे. याबाबतची माहिती वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी दिली. एमबीबीएस किंवा मेडिकल यासारख्या शाखांचं शिक्षण इंग्रजी भाषेतूनच दिलं जाणार आहे, मात्र, विद्यार्थांना विषय समजून घेता यावा, यासाठी संबंधित विषयांच्या पुस्तकांचा मराठी अनुवाद केला जाणार आहे. संबंधित योजनेची माहिती देताना गिरीश महाजन म्हणाले, एमबीबीएस, मेडिकलनंतर नर्सिंग, डेंटल अशा अभ्यासक्रमाचं टप्प्याटप्प्याने अनुवाद करण्यात येणार आहे. यावर्षी एमबीबीएसचा अभ्यासक्रम मराठीतून अनुवाद केला जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतरही अभ्यासक्रम मराठीत अनुवाद केले जातील. पुढील वर्षापासून विद्यार्थांना संबंधित पुस्तकं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. वैद्यकीय शिक्षण हे इंग्रजीतच असणार आहे. पण ते विद्यार्थांना समजण्यासाठी सोपं जावं म्हणून त्याचा मराठीत अनुवाद केला जाणार आहे, अशी माहिती महाजन यांनी दिली.

# शिंदे-फडणवीस सरकारचा निर्णय

## महाविकास आघाडीतील बड्या नेत्यांची सुरक्षा काढली

**।मुंबई। महाईन्यूज ।**

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारकडून आज(शुक्रवार) एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. महाविकास आघाडीतील बड्या नेत्यांची सुरक्षा राज्य सरकारने काढली आहे. मात्र मिलिंदि नार्वेकर यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून, जितेंद्र आव्हाड यांची सुरक्षा जैसे थे ठेवण्यात आली आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात जोरदार



चर्चा सुरू आहेत. राज्यात सत्ताबदल होऊन शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून विविध मुद्द्यांवरून वारंवार राज्य सरकारवर टीका केली जात आहे. आता शिंदे सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे एकच खळबळ उडाल्याचे दिसत आहे. मिलिंद नार्वेकर यांच्या सुरक्षेत झालेली वाढ हा त्यातमध्ये सर्वाधिक चर्चेचा विषय आहे. कारण, मिलिंद नार्वेकर हे शिवसेनेचे नेते आणि उद्धव ठाकरे यांचे अत्यंत जवळचे मानले जातात, मात्र मध्यंतरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी त्यांची झालेली भेट ही चर्चेचा विषय ठरली होती. त्यानंतर आता त्यांची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आल्याने चर्चेला अधिकच जोर आला आहे.

# कथित एसआरए घोटाळ्याप्रकरणी किशोर पेडणेकर यांची चौकशी

**।मुंबई। महाईन्यूज ।**

झोपडपट्टी पुनवर्सन योजनेत झालेल्या घोटाळ्यासंदर्भात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातील नेत्या आणि मुंबईच्या माजी महापौर किशोर पेडणेकर यांची शुक्रवारी दादर पोलिसांकडून चौकशी करुन जबानी नोंदविण्यात आली आहे. शनिवारी त्यांना पुन्हा चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. किशोर पेडणेकर यांच्या चौकशीमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. किशोरी पेडणेकर यांनी भाजपासह एकनाथ शिंदे व त्यांच्या समर्थक आमदारांविरुद्ध आक्रमक भूमिका घेतल्याने त्यांच्यावर



सुडाचे राजकारण सुरू असल्याचे बोलले जाते. जूनमध्ये दादर पोलिसांनी एसआरए घोटाळ्याप्रकरणी एक गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यात काही संशयिताची पोलिसांकडून चौकशी करण्यात आली होती. चौकशीनंतर पोलिसांनी चार आरोपींना अटक केली होती. त्यात महानगरपालिकेचा एका कर्मचाऱ्यासह किशोरी पेडणेकर यांचा जवळचा सहकारी होता.

# महाराष्ट्राचं हित डावलून "शिंदे-फडणवीस सरकार गुजरातचे एजंट

## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांचा हल्लाबोल

**।मुंबई । महाईन्यूज ।**

**"महाराष्ट्रातील उद्योग धंदे, महत्वाच्या संस्था गुजरातला घेऊन जायच्या, मुंबई आणि महाराष्ट्राचे महत्व कमी करायचे. या ध्येयाने केंद्राने मोदी सरकार गेल्या आठ वर्षापासून काम करत आहे," असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.**

**"राज्यात सत्ताबद्दलानंतर आलेले शिंदे फडणवीस सरकार हे तर गुजरातचे एजंट होऊन महाराष्ट्रातील उद्योग धंदे गुजरातला पाठवत आहे. एक दिवस हे सरकार मुंबई ही गुजरातला देऊन टाकतील. महाराष्ट्राचे नुकसान करून गुजरातचे हित जोपासणारे शिंदे फडणवीस महाराष्ट्रद्रोही आहेत हे स्पष्ट झाले आहे," असंही पटोले म्हणाले.**



"महाराष्ट्र देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. देशातील सर्वात जास्त मोठे उद्योग महाराष्ट्रात आहे. गुजरात महाराष्ट्राच्या मागे आहे याचे शल्य पंतप्रधान मोदींना आहे. त्यामुळेच त्यांनी पंतप्रधान झाल्यापासून महाराष्ट्रातील महत्वाचे प्रकल्प आणि संस्था गुजरातला हलवण्याचा सपाटा लावला आहे," असा आरोप पटोले यांनी केला आहे. "दुर्देवाने यापूर्वीचे फडणवीस आणि आताचे ईडी या दोन्ही सरकारांनी महाराष्ट्राचं हित डावलून मोदींच्या गुजरातच्या हिताला जास्त महत्व दिले आहे. फडणवीस सरकारच्या काळात मुंबईतील आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र, पालघर येथील प्रस्वातील मरीन अकादमी, मुंबईतील डायमंड बोर्स असे अनेक महत्वाचे प्रकल्प गुजरातला गेले," असंही नाना पटोलेंनी म्हटलं आहे. "महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात गुजरातला प्रकल्प जाणे थांबले होते.

त्यामुळेच मोदी शाह यांनी ईडीचा वापर करून राज्यातील महाविकास आघाडी सरकार पाडून गुजरातच्या तालावर नाचणा-या कळसुत्री बाहुल्यांचे सरकार आणले आहे," असा अप्रत्यक्ष टोला पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा थेट उल्लेख न करता लगावला. "या सरकारच्या काळात वेदांता फॉक्सकॉनचा २ लाख कोटी रूपयांचा प्रकल्प गुजरातमध्ये गेला. बल्क ड्रग पार्क प्रकल्पही राज्याबाहेर गेला. त्यानंतर आता टाटा एअरबसचा २२ हजार कोटी रूपयांचा प्रकल्पही गुजरातला गेला," असंही पटोलेंनी म्हटलं."राज्यात सरकार बदलल्यापासून तीन महिन्यात तीन मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेले आहेत. काही दिवसांपूर्वी टाटा एअरबसचा प्रकल्प राज्यात येणार म्हणून जाहीरपणे सांगणारे राज्याचे उद्योगमंत्री आता निर्लज्जपणे हा प्रकल्प मागील सरकारमुळे राज्याबाहेर गेला असे सांगत आहेत. उदय सामंत हे महाराष्ट्राचे उद्योगमंत्री आहेत की गुजरातचे? असा प्रश्न राज्यातील जनतेला पडला आहे,"

# देशभरात पोलिसांसाठी लागू होणार ‘एक राष्ट्र, एक गणवेश’?

## पंतप्रधान मोदींचे राज्यांना आवाहन

।मुंबई ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज हरियाणातील सूरजकुंडमध्ये सर्व राज्यांच्या गृहमंत्र्यांनी दोन दिवशीय चिंतन शिबीराचे आयोजन केले आहे. यावेळी पंतप्रधान मोदींनी व्हिडीओ कॉन्फ्रेसिंगद्वारे चिंतन शिबीराला संबोधित केले. या शिबिरात मोदींनी देशभरातील पोलीस यंत्रणेबाबत एक महत्वाची सूचना केली आहे. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे चोवीस तास सुरु असणारे कार्य आहे. मात्र कोणतेही काम अधिक चांगल्याप्रकारे करण्यासाठी आपल्याला प्रक्रियांमध्ये सतत सुधारणा करावी लागते. यामुळे देशांतर्गत सुरक्षेसाठी आपल्याला एकत्रित काम करावे लागेल.



### पोलिसांसाठी एक राष्ट्र, एक गणवेश

**या शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांनी देशभरातील सर्व राज्यांच्या पोलिसांसाठी एकच समान गणवेशाचा मुद्दा विचारात घ्यावा, असे पंतप्रधानांनी सांगितले. या प्रक्रियेला वेळ लागू शकतो. 5, 50 किंवा 100 वर्षे लागू शकतात, परंतु आपण याचा विचार केला पाहिजे. असही मोदी म्हणाले.**

असे केल्यास देशभरातील नागरिक देशभरात कोठेही पोलीस कर्मचाऱ्यांना लगेच ओळखू शकतील आणि त्याचबरोबर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांना देशभरात समान ओळख प्राप्त होईल, राज्यांच्या गणवेशांवर त्यांचे विशिष्ट क्रमांक किंवा चिन्हे असू शकतात. ‘एक राष्ट्र, एक पोलिस गणवेश’ ही संकल्पना मी केवळ तुमच्या विचारार्थ मांडतो आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले. पर्यटनाशी संबंधित पोलीसांसाठी विशेष क्षमता विकसित करण्याबाबत विचार करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. पर्यटक हे कोणत्याही ठिकाणाची प्रतिष्ठा सर्वदूर पोहोचवणारे सर्वात महत्वाचे आणि वेगवान दूत असतात, असे पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधानांनी संवेदनशीलता आणि जनतेच्या मनात आपुलकीची भावना विकसित करण्याच्या मुद्द्यावर भर दिला. साथीच्या काळात पोलिसांनी जनतेला विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्यासाठी केलेल्या दूरध्वनींचे उदाहरण त्यांनी दिले. गुप्तवार्ता मिळविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानातील प्रगतीबरोबरच त्यासाठीचे मानवी कौशल्य विकसित करण्याचे महत्त्व पंतप्रधानांनी अधोरेखित केले. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असे ते म्हणाले. भारताच्या वाढत्या विकासाकडे पाहता नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी दक्ष राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. व्हा देशाची ताकद वाढेल, तेव्हा देशातील प्रत्येक नागरिकाची आणि प्रत्येक कुटुंबाची शक्तीही वाढीला लागेल, असे पंतप्रधान म्हणाले. हे सुशासन आहे, इथे प्रत्येक राज्यातील तळागाळातील व्यक्तीपर्यंत सुशासनाचे लाभ पोहोचतात असे सांगत, कायदा आणि सुव्यवस्था आणि राज्यांचा विकास यांच्यातील परस्परसंबंध महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. संपूर्ण कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणा विश्वसनीय असणे खूप महत्वाचे आहे. जनमानसात त्यांच्याबद्दल विश्वास आणि समज असणेही गरजेचे आहे,.

# जागा 1 उमेदवार 35

## गुजरातमध्ये काँग्रेसच्या जागेवर भाजपचा दावा

।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

निवडणूक जवळ आली की प्रत्येक नेता आणि पक्ष जोमाने कामाला लागतात. अशातच गुजरात राज्यातही विधानसभा निवडणूका लवकर होणार आहेत. अशातच तिथे सुद्धा भाजपकडून जोमाने निवडणुकीची तयारी करण्यात येत आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी भाजप ग्राउंड लेव्हलला जाऊन तिकीट वाटपाच्या कामाचा सर्वे करण्यात येत आहे. गुजरातमधील विद्यमान आमदारांना तिकीट द्यायचे की दुसऱ्या उमेदवारांना संधी द्यायची यावरच गुजरातमधील प्रत्येक मतदारसंघाचा संपूर्ण अहवाल तयार करण्यात येणार आहे. यासाठी निरीक्षकांना तीन दिवसांसाठी गुजरात मतदार संघात पाठविण्यात आले आहे. या सगळ्यात जी उमेदवार योग्य आणि उत्तम असेल त्यालाच संधी देण्यात येणार आहे. अशातच गुजरात मधील एका मतदार संघाने भाजपच्या नाकीनऊ आणले आहेत.

निवडणूक म्हटली की सर्वच गोष्टींचा विचार करावा लागतो. गुजरात मधील अरवल्ली जिल्ह्यातील मोडासा विधानसभा मतदारसंघात भाजपच्या नेत्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. सध्या याच विधानसभा मतदारसंघात कांग्रेस पक्षाचा आमदार आहे.

# दहशतवाद कमी करायचा असेल तर त्यांचा वित्तपुरवठा थांबविणे गरजेचे

## दहशतवादविरोधी समितीच्या बैठक परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचे प्रतिपादन

।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

शुक्रवारी मुंबईतील ताजमहाल या हॉटेलमध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतर्फे दहशतवादविरोधी समितीची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी समितीच्या सदस्यांनी 26/11 च्या भीषण हल्ल्याचे स्मरण करून येथे शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहिली. बैठकीदरम्यान ब्रिटनचे परराष्ट्र सचिव जेम्स क्लेवर्ली यांनी सांगितले की, ब्रिटन कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाचा निषेधच करतो. दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी आम्ही भारत आणि आमच्या मित्रराष्ट्रांसोबत



काम करण्यासाठी तयार आहोत, असे ते म्हणाले या कार्यक्रमाला संबोधित करताना परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर म्हणाले, 26/11 चा हल्ला ज्या ठिकाणी झाला होता, त्या ठिकाणी UNSC दहशतवाद विरोधी समितीने एकत्र येणे अत्यंत महत्वाचे आहे. एकत्रितपणे आपण आंतरराष्ट्रीय समुदायाला संदेश

### ■ सुरक्षा परिषदेची कारवाई खेदजनक

**परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले की, दहशतवाद हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी गंभीर धोका आहे. आज आम्ही पीडितांचा आवाज ऐकला आहे. हा आघात आपण नेहमी लक्षात ठेवू आणि दहशतवाद्यांना न्यायव्यवस्थेसमोर आणण्याचा प्रयत्न करू. ते म्हणाले, दहशतवादाचा मुकाबला करण्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा आणि हाच वित्तपुरवठा तातडीने थांबविणे गरजेचे आहे. काही दहशतवाद्यांवर बंदी घालण्याच्या बाबतीत सुरक्षा परिषद राजकीय कारणास्तव कारवाई करू शकली नाही हे खेदजनक आहे. यामुते आमची सामूहिक विश्वासार्हता आणि आमचे सामूहिक हितसंबंध कमी होते.**

द्यायला हवा की संयुक्त राष्ट्र आणि त्याचे सदस्य राष्ट्र दहशतवाद्यांना जबाबदार धरण्यात कधीही हार मानणार नाहीत. “आम्ही 26/11 च्या हल्ल्याच्या मास्टरमाइंड आणि गुन्हेगारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु हे काम अद्यापही अपूर्ण आहे,” ते म्हणाले. यादरम्यान परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी 26/11 च्या स्मृतीस्थळाला पुष्पहार अर्पण करताना सांगितले की, मुंबईवर झालेला हा हल्ला कधीही विसरता येणार नाही.

# हवामानात पुन्हा बदल, देशातील बहुतांश राज्यांमध्ये पाऊस पडण्याची शक्यता

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

देशातील अनेक राज्यांमधील तापमानात सातत्याने बदल होताना पाहायला मिळत आहे. काही राज्यातील थंडीचा पारा चढला असून, काही राज्यांतील तापमानात वाढ झाली आहे. तसेच, पुन्हा एकदा



अनेक भागांत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. देशातील बहुतांश राज्यांमध्ये तापमानात झपाट्याने घट होत असल्याने थंडीचा कडाका जाणवू लागला आहे. दिल्ली ते यूपीपर्यंत उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये थंडीला सुरुवात झाली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये पुढील 5 दिवस हवामान कोरडे राहील. तसेच, दिल्लीत गुरुवारी किमान तापमान 15 अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे सामान्यपेक्षा 2 अंश कमी आहे. आजही दिल्लीचे किमान तापमान 15 अंश राहणार असून, कमाल तापमान 32 अंश असेल.

त्याशिवाय, ईशान्य दिशेकडून वारे वाहू लागले आहेत, त्यामुळे उत्तर-पूर्व मान्सून सुरू होईल. आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये २९ ऑक्टोबरपासून पावसाच्या हालचाली सुरू होतील. वायव्य दिशेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे उर्वरित भारतातील तापमानात घट होईल. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पश्चिम मध्य आणि लगतच्या दक्षिण-पश्चिम बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळाचे परिवलन कायम आहे. त्याच वेळी, दक्षिण अंतर्गत कर्नाटक ते नैऋत्य बंगालच्या उपसागरमार्गे तामिळनाडूपर्यंत कमी दाबाचा पट्टा कायम आहे. हवामान खात्याने आज तामिळनाडू आणि केरळमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा दिला आहे. काही ठिकाणी मुसळधार पाऊसही पडू शकतो. या राज्यांमध्ये आज म्हणजेच 28 ऑक्टोबर रोजी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# चिन्मय मांडलेकर 'सनी'मध्ये दिसणार अत्यंत वेगळ्या आणि फ्रेश भूमिकेत!

लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या हेमंत ढोमे दिग्दर्शित 'सनी' या चित्रपटातील एक एक व्यक्तिरेखा आता गुलदस्त्याबाहेर येऊ लागल्या आहेत. विश्वजित मोहिते पाटील या कार्यसम्राट आमदाराची व्यक्तिरेखा समोर आली असून चिन्मय मांडलेकर यांनी ही भूमिका साकारली आहे.

व्यक्तिरेखेची झलक पाहता विश्वजित अतिशय करारी, शिस्तप्रिय दिसत आहेत. घरात असलेला त्यांचा दबदबाही यातून अधोरेखित होत असून सनी आणि त्यांच्या नात्यात कटुता असल्याचे भासतेय. आता विश्वजित आणि सनीमध्ये नेमका कशावरून हा दुरावा आलाय, हे चित्रपट पाहिल्यावरच समजेल. चिन्मय यांचा फ्रेश आणि वेगळा लुक लक्ष वेधुन घेतोय, त्यामुळे उत्सुकता अजुन वाढली आहे. सुपरहिट चित्रपट झिम्माच्या टिमची 'सनी' ही पुढील भेट आहे.


क्रेझी फ्यु फिल्म्स, प्लॅनेट मराठी, क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन प्रस्तुत, चलचित्र कंपनी निर्मित 'सनी' हा सिनेमा १८ नोव्हेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. इरावती कर्णिक लिखित या चित्रपटात 'सनी'ची भूमिका ललित प्रभाकरने साकारली आहे. अक्षय विलास बर्दापूरकर, क्षिती जोग, विराज गवस व उर्फी काझमी हे सिनेमाचे निर्माते असून संतोष खेर, तेजस्विनी पंडित सह-निर्माते आहेत.




# घरापासून दूर असलेल्या प्रत्येकासाठी 'रात ही'

## - दिवाळीच्या निमित्ताने 'सनी'तील गाणे प्रदर्शित

असं म्हणतात, लांब गेल्यावरच जवळच आठवतं! आणि हे अगदी बरोबर आहे. घरापासून दूर गेल्यावरच आपल्याला घराची, घरच्यांची किंमत कळते. घरापासून दूर असलेल्या प्रत्येकाच्या मनातील तळमळ असलेले 'सनी' चित्रपटातील 'रात ही' हे गाणं दिवाळीच्या निमित्ताने प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. कामानिमित्ताने, शिक्षणानिमित्ताने आपल्या कुटुंबापासून, मित्रमैत्रिणींपासून लांब असणाऱ्या प्रत्येकासाठी हे गाणं आहे. क्षितिज पटवर्धन यांचे भावस्पर्शी बोल असणाऱ्या या गाण्याला सौमील - सिद्धार्थ यांनी संगीतबद्ध केले आहे. तर या गाण्याला निखिल डिसुझा याचा आवाज लाभला आहे. इरावती कर्णिक लिखित 'सनी' या चित्रपटाचे दिग्दर्शन हेमंत ढोमे यांनी केले आहे. घरापासून लांब गेलेल्या ललित प्रभाकराला म्हणजेच 'सनी'ला क्षणोक्षणी घरच्यांची, त्याच्या मित्रांची आठवण येत आहे. ज्या गोष्टी घरी असताना त्याला क्षुल्लक वाटत होत्या, त्याचे महत्व त्याला घरापासून लांब गेल्यावर उलगडत आहे. 'होमसिक' बनलेल्या 'सनी'चा एक भावनिक प्रवास यात दिसत आहे. या गाण्याबद्दल दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणतात, "या गाण्यात आणि माझ्या आयुष्यात खूप साम्य आहे. घरी असताना अशा अनेक छोट्या-छोट्या गोष्टी असतात, ज्या आपल्यासाठी नगण्य असतात. परंतु घरापासून दूर गेल्यावर त्याच गोष्टींचे आपल्या आयुष्यात किती खास महत्व आहे ते कळते. विशेषतः सणासुदीच्या दिवसांत आपले घर, कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार यांची आठवण खूप येते. घरापासून दूर राहणाऱ्या प्रत्येकाची कहाणी म्हणजे 'सनी'. हे मनाला भिडणारे गाणे तुम्हाला नक्की आवडेल."




क्रेझी फ्यु फिल्म्स, प्लॅनेट मराठी, क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन प्रस्तुत, चलचित्र कंपनी निर्मित 'सनी' हा सिनेमा १८ नोव्हेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. अक्षय विलास बर्दापूरकर, क्षिती जोग, विराज गवस व उर्फी काझमी हे सिनेमाचे निर्माते असून संतोष खेर, तेजस्विनी पंडित सह-निर्माते आहेत.

# 'बेबी ऑन बोर्ड'चा प्रवास सुरु

### श्रुती-सिद्धार्थची ही धमाल जर्नी आजपासून 'प्लॅनेट मराठी' ओटीटीवर

'बेबी ऑन बोर्ड'च्या ट्रेलरनंतर प्रेक्षकांची या सीरिजविषयीची उत्सुकता अधिकच वाढली. प्रेक्षकांच्या या उत्सुकतेला पूर्णविराम देत, 'बेबी ऑन बोर्ड' चे २ एपिसोड्स प्लॅनेट मराठी ओटीटीवर प्रदर्शित झाले आहेत. 'बेबी ऑन बोर्ड'च्या पहिल्या दोन एपिसोड्समध्ये प्रतीक्षा मुणगेकर म्हणजेच श्रुती व अभिजीत आमकार म्हणजेच सिद्धार्थचा त्यांच्या नव्या घरात गृहप्रवेश पाहायला मिळत आहे. गृहप्रवेश करतानाचा या जोडप्याचा आनंद, उत्सुकता यात दिसतोय. श्रुतीचे बाळंतपण सिद्धार्थने करायचे ठरवल्यावर आता एक बाबा आणि नवरा म्हणून त्याची जबाबदारी तो कशी पार पाडतो, या दरम्यान या दोघांमध्ये होणारी नोकझोक यात अधिकच रंगत आणत आहे. श्रुतीचे डोहाळे पुरवण्यापासून तिच्या प्रेग्नंन्सी डाएटपासून खाण्या - पिण्याच्या वेळेची काळजी सिद्धार्थ घेतोय. स्वतः चमचमीत, चाविष्ट पदार्थांचा त्याग करणारा, श्रुतीला मॉर्निंग वॉकला घेऊन जाणारा एक उत्तम नवरा आणि 'डॅड टू बी' सिद्धार्थ सर्वांनाच आवडेल. पहिल्या दोन एपिसोड्सने प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केल्यानंतर आता उत्सुकता लागून राहिली आहे ती पुढील एपिसोड्सची.अक्षय बर्दापूरकर म्हणतात, "बेबी ऑन बोर्डचे पहिले दोन एपिसोड्स प्लॅनेट मराठी ओटीटीवर आले असून प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहेत. श्रुती व सिद्धार्थ या दोघांची जोडी प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडत आहे.



# 'मन कस्तुरी रे' मधील तेजस्वी व अभिनय यांच्या प्रेमाला 'रंग'

### चित्रपटातील रोमँटिक साँग प्रेक्षकांच्या भेटीला

'मन कस्तुरी रे'चा जबरदस्त ट्रेलर पाहून प्रेक्षकांची चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढली असतानाच आता या चित्रपटातील 'रंग लागला' हे रोमँटिक साँग प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या गाण्यात तेजस्वी आणि अभिनयमध्ये नव्यानं हळुवार फुलत जाणारं प्रेमाचं नातं दिसत आहे. कॉलेजमधील बहरत जाणारं प्रेम, धमाल यात दिसत आहे. शोर यांनी या गाण्याला संगीत, शब्दबद्ध केले असून आनंदी जोशी आणि अभय जोधपूरकर यांच्या सुमधुर आवाजाची जादू या गाण्यातून अनुभवता येत आहे.

हल्ली व्हायरल झालेल्या 'नाद' या रॉक साँगनंतरचे हे रोमँटिक गाणे तरुण तरुणींना एका वेगळ्या विश्वात घेऊन जाणार आहे. जिथे या प्रेमीयुगुलांना कस्तुरीचा शोध लागेल.

दिग्दर्शक संकेत माने म्हणतात, " तेजस्वी आणि अभिनय या दोघांची केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहे. 'मन कस्तुरी रे' च्या सगळ्याच गाण्यांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'रंग लागला' हे गाणंही प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.”








गाण्याचे संगीत दिग्दर्शक शोर म्हणतात, " या चित्रपटातील गाण्यांना तरुणांकडून कमालीचा प्रतिसाद मिळतोय. यापूर्वी प्रदर्शित झालेली गाणीही ट्रेंडिंगमध्ये आहेत. 'रंग लागला' हे गाणे आता प्रेक्षकांसाठी घेऊन आलो आहोत, हे रोमँटिक गाणं देखील प्रेक्षकांना मोहित करेल.”संकेत माने दिग्दर्शित 'मन कस्तुरी रे' येत्या ४ नोव्हेंबर रोजी सिनेमागृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नितीन केणी यांच्या नेतृत्वाखाली मुंबई मुव्ही स्टुडिओज प्रस्तुत, व्यंकट अत्तिली, मृत्यूंजय किचंबरे यांच्या ईमेन्स डायमेंशन एन्टरटेनमेंट ॲण्ड आर्ट्स निर्मित या चित्रपटाचे सहनिर्मति ड्रॅगन वॉटर फिल्म्सचे निशीता केणी आणि करण कोंडे आहेत. वितरणाचे काम युएफओ सिने मीडिया नेटवर्क करणार असून संगीत प्रदर्शनाची धुरा टिप्सने सांभाळली आहे. 'सैराट'सह अनेक सुपरहिट चित्रपटांची निर्मिती करणारे नितीन केणी 'मन कस्तुरी रे'चे प्रस्तुतकर्ता आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### इलेक्ट्रिशियनच्या मुलाची योगामध्ये गरुडझेप



**।नागपूर। महाईन्यूज**

आजकालच्या तरुणांचा क्रिकेट व बॅडमिंटनसारख्या ग्लॅमरस खेळांकडे अधिकाधिक कल दिसून येतो. देशी योगाची बहुतेकांना ॲलर्जी असते. मात्र या दुर्लक्षित खेळातही नाव कमावता येऊ शकते हे आंतरराष्ट्रीय योगपटू वैभव श्रीरामेने आपल्या कामगिरीने दाखवून दिले आहे. त्याने गुजरातमध्ये अलीकडे पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तीन सुवर्णांसह पाच पदके पटकावून योगामध्ये अमिट छाप सोडली. दर महिन्याला जेमतेम १०-१२ हजारांची कमाई करणाऱ्या इलेक्ट्रिशियनचा (वामन श्रीरामे) मुलगा असलेल्या वैभवला खरं तर शिक्षण शिकून व नोकरी करून स्वतःच्या पायावर उभे व्हायचे होते. घरची परिस्थिती मजबूत नसल्याने आईवडिलांना आर्थिक हातभार लावायचा होता. मात्र त्याची पावले योगाकडे कधी वळली, हे त्यालादेखील कळले नाही.

# झिम्बाब्वेने एका धावेने केलेल्या पराभवानंतर बाबर आझम संघावर नाराज

## झिम्बाब्वेने अटीतटीच्या सामन्यात पाकिस्तानचा केला पराभव

**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताने केलेल्या पराभवाच्या धक्क्यातून पाकिस्तान संघ सावरलेला नसताना त्यांना अजून एक धक्का बसला आहे. झिम्बाब्वेने अटीतटीच्या सामन्यात पाकिस्तानचा पराभव केला आहे. आतापर्यंत झालेल्या दोन्ही सामन्यात पराभव झाल्याने पाकिस्तानी संघाची आणि चाहत्यांची निराशा झाली आहे. पाकिस्तान संघाचा कर्णधार बाबर आझमनेही संघाच्या कामगिरीवर नाराजी जाहीर केली आहे.

झिम्बाब्वेने प्रथम फलंदाजी करत ८ गडी गमावत १३० धावा केल्या होत्या. छोटं आव्हान असतानाही झिम्बाम्बेने पहिल्या चेंडूपासून पाकिस्तानला कडवी झुंज दिली. शेवटच्या चेंडूवर पाकिस्तानला विजयासाठी तीन धावांची गरज होती. मात्र पाकिस्तानला दोनच धावा मिळाल्या आणि झिम्बाम्बेने शेवटच्या चेंडूवर हा सामना जिंकला.

"आमच्या संघाने फारच निराशाजनक कामगिरी केली आहे. आम्ही फलंदाजी अपेक्षेप्रमाणे केली नाही. पहिल्या सहा षटकांमध्ये आम्ही फार वाईट खेळलो. शादाब आणि शान यांनी चांगली भागीदारी केली. पण दुर्दैवाने शादाब बाद झाला आणि त्यानंतर मागोमाग गडी बाद झाले. ज्यामुळे फलंदाजांवर दबाव निर्माण झाला," असं बाबर आझमने सामना संपल्यानंतर बोलताना सांगितलं.

"पहिल्या सहा षटकांमध्ये आम्ही नव्या चेंडूचा योग्य वापर नाही करत आहोत. आम्ही एकत्र बसून झालेल्या चुकांवर चर्चा करु. पुढील सामन्यात आम्ही नक्की पुनरागन करु," असा विश्वास बाबर आझमने व्यक्त केला आहे. टॉस जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने पाकिस्तानसमोर १३१ धावांचे लक्ष्य ठेवलं होतं. प्रत्युत्तरात पाकिस्तान संघाला आठ विकेट्सच्या मोबदल्यात केवळ १२९ धावा करता आल्या आणि एका धावेने सामना गमावावा लागला. यामुळे पाकिस्तानवर आता विश्वचषकातून बाहेर पडण्याचं संकट निर्माण झालं आहे.

# अक्षर पटेलची फलंदाजीतील क्रमवारी निश्चित नाही

## संघ व्यवस्थापनाने सांगितली भूमिका



**।ओडेन्से। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

रविंद्र जडेजाची जागा भरणे कठीण आहे, परंतु भारतीय संघ व्यवस्थापनाने अक्षर पटेलला गरज पडल्यास वरच्या क्रमांकावर फलंदाजीसाठी तयार राहण्यास सांगितले आहे. भारताचे टॉप-६ फलंदाज राईट हँड असणारे फलंदाज असून ऋषभ पंतला टी२० विश्वचषकात खेळवण्याचा अद्याप कुठलाही निर्णय झाला नाही आम्ही आमची रणनीती आखून त्याप्रमाणे सर्व काही करणार आहोत.

अशा परिस्थितीत विरोधी संघाच्या गोलंदाजांचा वेग बिघडवण्यासाठी डाव्या हाताच्या फलंदाजाची गरज असते. भारत- पाकिस्तान सामन्यात अक्षरला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवण्यात आले, पण हा निर्णय प्रभावी ठरला नाही. केवळ एक धाव घेऊन तो धावबाद झाला. टीम इंडिया सध्या सुपर-१२ चे दोन्ही सामने जिंकून अव्वल स्थानावर आहे. अक्षर पटेलने माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, 'पाकिस्तानकडे डावखुरा फिरकीपटू नवाज आणि लेगस्पिनर शादाब खान होते. त्यावेळी म्हणूनच डाव्या हाताच्या फलंदाजाला पाठवणे महत्त्वाचे होते आणि मला फलंदाजीसाठी पाठवले. अशा परिस्थितीसाठी नक्की कशी मानसिकता ठेवायची असते हे मला राहुल द्रविड सरांनी सांगितले होते. तुझी विकेटही जाऊ शकते आणि त्यासाठी तू तयार असले पाहिजे, असे ते म्हणाले. मला ही भूमिका देण्यात आली असून मी सराव सामन्यात चांगली कामगिरी केली."

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजिटल आवृत्ती छपाईसाठी नाही